**माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी सर्व सार्वजनिक प्राधीकरणांकडून होणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.६६/सहा,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १३ एप्रिल, २०१८

**पहा:- (१) शासन परिपत्रक क्र.केमाअ २०१३/१५६/प्र.क्र.३६० /सहा, दि.०९.०५.२०१४**
**(२) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१४/प्र.क्र.(२४०/१४) सहा, दि.१३.०२.२०१५**
**(३) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/ प्र.क्र.(४७/१५) /सहा, दि.०५.०५.२०१५**

**परिपत्रक:-**

सार्वजनिक प्राधिकरणाने स्वत:हून किंवा सकारात्मक तत्वावर माहितीचा अधिकार अधिनियम, याच्या कलम ४(१)(ख) अन्वये निर्धारित केलेली माहिती प्रकट करणे अपेक्षित आहे. कलम ४(२) व कलम ४(३) मध्ये या माहितीचा प्रसार करण्याची पध्दत विहित केली आहे. सार्वजनिक प्राधिकरणांची कार्ययंत्रणा अधिक पारदर्शक बनविण्याकरिता तसेच माहितीच्या अधिकारात व्यक्तिगत अर्ज करण्याची गरज कमी होण्याकरिता, सकारात्मक तत्वावर सार्वजनिक क्षेत्रातील माहिती जनतेला मोठया प्रमाणात मिळण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी कलम ४ अन्वये, स्वत:हून माहिती प्रकट करावयाची आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांना सूचना दिलेल्या आहेत. तथापि, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलांचा ओघ वाढत असून अपीलांची प्रलंबितताही वाढत आहे. त्याकरीता माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ ची अंमलबजावणी अधिक परिणामकारकरित्या होणे आवश्यक आहे. सार्वजनिक प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात ज्या बाबींची माहिती, माहिती अधिकारांतर्गत मागितली जाते त्या बाबींची माहिती सार्वजनिक प्राधिकरणांनी स्वयंप्रेरणेने प्रसिध्द केल्यास माहिती अधिकार अर्जांचे प्रमाण कमी होईल. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी अर्जदाराचे समाधान करण्याचा प्रयत्न केल्यास व आपल्या आदेशाची पूर्तता करण्याबाबत आढावा घ्यावा जेणेकरुन आयोगाकडे होणा-या द्वितीय अपीलांची संख्या कमी होण्यास मदत होईल.

२. उपरोक्त बाबी सर्व विभागांच्या व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/सार्वजनिक प्राधिकरणे यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०४२०१५२१५७०६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shwetambari Pravin Khade

Digitally signed by Shwetambari Pravin Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d2e526f024133a519abcf2dbb6bd01281beb6bf02f01c42818d29e1399ab8446, cn=Shwetambari Pravin Khade
Date: 2018.04.20 15:23:09 +05'30'

**( श्वे.प्र.खडे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**,

१) मा. राज्यपाल, यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई

३) मा. विरोधी पक्षनेता, (विधानसभा), महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन,मुंबई,

४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

५) सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई,

६) महालेखापाल-१/२(लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) महालेखापाल-१/२(लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८) सर्व माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य,

९) सचिव राज्य माहिती आयोग,मुंबई.

१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,

११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.

१३) निवडनस्ती कार्यासन सहा.